महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ २३ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १४८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

लक्षवेधी

## वालधुनी पुलाजवळ भीषण अपघात

### ट्रकच्या धडकेत पती-पत्नी गंभीर जखमी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेकडील वालधुनी पुलाजवळ प्रतिबंधित क्षेत्रात अवजड वाहनांची वाहतूक सुरू असतानाच, एका ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत दुचाकीवरील महिला हवेत फेकली गेली, तर तिचा पती ट्रकच्या पुढील चाकाखाली अडकून गंभीर जखमी झाला. नागरिकांनी तातडीने धाव घेतल्यामुळे जीवीतहानी टळली. या प्रकरणी ट्रक चालकाविरोधात कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, वालधुनी पुलावर अवजड वाहनांना प्रवेशबंदी असतानाही ट्रकचालकाने ट्रक पुलावर नेला. याच वेळी ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर दुचाकी ट्रकच्या पुढील चाकाखाली घासत काही अंतर पुढे गेली. घटनेनंतर नागरिकांनी आरडाओरड केल्यावर ट्रक चालकाने गाडी थांबवली, अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती. अपघातामुळे घटनास्थळी काही वेळासाठी वाहतूक ठप्प झाली होती.

## नवरंग कंपाउंडला भीषण आग



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबईतील धारावीतील सायन-माहीम लिंक रोडवर असलेल्या माहीम गेटजवळील नवरंग कंपाउंडमध्ये शनिवारी (22 नोव्हेंबर) दुपारी मोठी आग लागली. आगीमुळे माहिम आणि वांद्रे स्थानकादरम्यान लोकल ट्रेन सेवा विस्कळीत झाली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. आगीचे कारण अद्याप स्पष्ट नाही.

आगीच्या घटनेची माहिती मिळताच दादर, बीकेसी, वांद्रे आणि शिवाजी पार्क अग्निशमन केंद्रातील अनेक अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाचे जवान सतत काम करत आहेत. अधिकाऱ्यांच्या मते, आगीचे कारण स्पष्ट झालेले नाही आणि नुकसानीचे प्रमाण अद्याप समजलेले नाही. घटनेच्या वेळी कंपाउंडमध्ये उपस्थित असलेल्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.

**पश्चिम रेल्वे सेवांवरही परिणाम**

आग रेल्वे ट्रॅककडे पसरू लागल्याने पश्चिम रेल्वेने अनेक सुरक्षा उपाययोजना केल्या. रेल्वेच्या म्हणण्यानुसार, माहीम आणि वांद्रे स्थानकांदरम्यान पाच लोकल गाड्या नियंत्रित करून थांबवण्यात आल्या आहेत. रेल्वे प्रवक्त्याने सांगितले की परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे आणि कोणत्याही प्रवासी जखमी झाल्याची नोंद नाही. आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत आणि अधिकारी कारण शोधण्यासाठी घटनास्थळाची पाहणी करत आहेत. परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर वाहतूक आणि स्थानिक सेवा पुन्हा सुरू होतील.

## जि.प. निवडणुकीसाठी यंत्रणेची लगीनघाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** जिल्हा परिषदेच्या ५३ गटांसह पाच पंचायत समित्यांच्या १०६ गणांची निवडणूक लवकरच पार पडणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाने नियोजन सुरू केले आहे. एकूण आठ लाख ९० हजार ६८० मतदार या निवडणुकीत आपला लोकशाही हक्क बजावणार असून त्यासाठी जिल्ह्यात एक हजार ९७ मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत.

# नगराध्यक्षपदासाठी बदलापूरमध्ये चौरंगी लढत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



### अंतिम दिवशी २२ जणांची माघार

**बदलापूर :** बदलापूर नगर परिषदेच्या निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट झाले आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीनंतर ४९ जागांच्या २४ पॅनेलमध्ये एकूण १३९ उमेदवार आपले राजकीय भवितव्य अजमावण्यासाठी रिंगणात ठाम उभे आहेत. १७ नोव्हेंबरपर्यंत एकूण १६१ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. शुक्रवारी (ता. २१) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी २२ उमेदवारांनी माघार घेतली. माघार घेणाऱ्यांमध्ये २० अपक्ष उमेदवार असून, उर्वरित दोन उमेदवार भाजप आणि महाविकास आघाडीचे आहेत. नगराध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केलेल्या पाच उमेदवारांपैकी कोणीही माघार घेतली नाही. त्यामुळे ही लढत अपेक्षेप्रमाणे चुरशीची झाली आहे. नगराध्यक्ष पदासाठी सहा अर्ज दाखल झाले होते. छाननीमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराचा अर्ज बाद झाला. बदलापूर नगराध्यक्षपदासाठी शिवसेना शिंदे गटाकडून वीणा म्हात्रे, भाजप-राष्ट्रवादीकडून रुचिता घोरपडे, महाविकास आघाडीकडून प्रिया गवळी, 'आप'कडून आस्था मांजरेकर आणि अपक्ष म्हणून (मनसे शहराध्यक्ष) संगीता चेंदवणकर यांनी अर्ज भरला होता. मनसेच्या शहराध्यक्ष संगीता चेंदवणकर यांनी आपली अपक्ष उमेदवारी कायम ठेवल्याने नगराध्यक्षपदाच्या लढतीला वेगळे वळण मिळाले आहे. त्यांच्या या निर्णयामुळे महाविकास आघाडीसमोर आव्हान उभे राहिले आहे.

**मतदारांमध्ये उत्सुकतेचा उच्चांक**

चेंदवणकर यांच्या अपक्ष उमेदवारीमुळे बदलापूरमध्ये आता नगराध्यक्षपदासाठी स्पष्ट चौरंगी लढत होणार आहे. भाजपा (रुचिता घोरपडे), महाविकास आघाडी (प्रिया गवळी), शिवसेना शिंदे गट (वीणा म्हात्रे), अपक्ष (संगीता चेंदवणकर) यांच्यात लढत होणार आहे. राजकीय वातावरण तापले असून शहरातील मतदारांमध्ये उत्सुकता ताणली आहे. कोणत्या पॅनेलचे पत्ते खुलणार आणि नगराध्यक्षपदाचा मान कुणाच्या पदरी पडणार, याची चर्चा बदलापुरात चांगलीच रंगू लागली आहे.

## अंबरनाथमध्ये भाजपच्या पाच उमेदवारांचे अर्ज बाद?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**अंबरनाथ :** अंबरनाथ नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या छाननी प्रक्रियेत भारतीय जनता पार्टीला (भाजप) मोठा धक्का बसला आहे. प्रभाग क्र. २९ए, २५बी, ६बी, ७ए आणि १३ए येथील भाजप उमेदवारांचे एकूण पाच नामनिर्देशन अर्ज बाद ठरल्याची माहिती समोर आली आहे.

अंबरनाथ नगरपालिकेत यंदा मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. नगराध्यक्ष पदासाठी १४, तर नगरसेवक पदासाठी तब्बल ४०० अर्ज दाखल झाले आहेत. मंगळवारी (ता. १८) रोजी निवडणूक निर्णय अधिकारी विजयानंद शर्मा व सहाय्यक निवडणूक अधिकारी उमाकांत गायकवाड, अमित पुरी यांच्या उपस्थितीत अर्जांची छाननी प्रक्रिया पूर्ण झाली. छाननीनुसार नगराध्यक्ष पदासाठी १४ अर्जांपैकी ३ अवैध, तर ११ अर्ज वैध नगरसेवक पदासाठी ४०० अर्जांपैकी ५४ अवैध, तर ३४६ अर्ज वैध ठरले आहेत. काही उमेदवारांनी एकापेक्षा जास्त अर्ज दाखल केल्याने त्यातील अतिरिक्त अर्ज बाद करण्यात आले.

**अर्ज बाद होण्याची कारणे**

काही उमेदवारांनी एकापेक्षा जास्त अर्ज दाखल केल्याने त्यातील अतिरिक्त अर्ज बाद करण्यात आले. काही अर्जामध्ये पक्षाचा एबी फॉर्म, सूचक/अनुमोदकांच्या सह्या, तसेच कागदपत्रांची अपूर्णता असल्याने ते अर्ज बाद ठरवण्यात आल्याची माहिती मिळते.

छाननीनंतर अंबरनाथमध्ये नगराध्यक्ष पदासाठी ११ उमेदवार, तर नगरसेवक पदासाठी ३४६ उमेदवार रिंगणात आहेत.

**छाननीनंतरची स्थिती**

| पदाचे नाव | एकूण अर्ज | अवैध ठरलेले अर्ज | वैध ठरलेले अर्ज |
|---|---|---|---|
| नगराध्यक्ष पद | १४ | ३ | ११ |
| नगरसेवक पद | ४०० | ५४ | ३४६ |

## रवींद्र चव्हाण यांच्या निकटवर्तीय नेत्याचा ठाकरे गटात प्रवेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** राज्यात सध्या सर्वत्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी सुरू आहे. विविध पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर हालचाली सुरू झाल्या आहेत. अनेक नेते आणि कार्यकर्त्यांचे पक्षांतर सुरू असून, यामध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महायुतीचे दोन्ही गट सक्रिय दिसत आहेत. आतापर्यंत उद्धव ठाकरे गटातील काही पदाधिकारी महायुतीकडे वळले होते. मात्र आता उलट चित्र दिसू लागले आहे. भाजपला डोंबिवलीत मोठा धक्का बसला असून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याच जवळच्या व्यक्तीने ठाकरे गटात प्रवेश केल्याची माहिती समोर आली आहे.

**भाजपच्या महत्त्वाच्या युवा नेत्याचा उद्धव ठाकरे गटात प्रवेश**



डोंबिवलीतील भाजप युवा मोर्चाचे उपाध्यक्ष असलेले योगेंद्र भोईर यांनी पक्षाचा निरोप घेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) मध्ये प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे, योगेंद्र भोईर हे भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे विश्वासू मानले जात होते. योगेंद्र आणि त्यांच्या पत्नी ट्विंकल भोईर यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांच्यासमोर पक्षप्रवेशाची औपचारिकता पूर्ण केली. दरम्यान, भाजपची साथ सोडल्यानंतर योगेंद्र भोईर यांनी सोशल मीडियावर एक भावनिक संदेश शेअर केला. त्यांनी लिहिले, "बदल हा निसर्गाचा नियम आहे आणि प्रगतीसाठी स्वतःमध्ये बदल करणे आवश्यक असते. राजकीय आयुष्यातील कठीण निर्णय घेत आज मी भाजप परिवारातून बाहेर पडलो आहे. रवींद्र चव्हाण दादांच्या मार्गदर्शनाखाली खूप काही शिकता आले. त्यांचं योगदान मी कधी विसरणार नाही." पुढे त्यांनी सांगितले, 'परंतु नवीन ठिकाणी पोहोचायचे असेल तर जुन्या ठिकाणावरून मार्गक्रमण सुरू करावेच लागते. त्यामुळे वैयक्तिक पातळीवर निर्णय घेऊन मी आता उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली माझी पुढील राजकीय वाटचाल सुरू करणार आहे.'

**डोंबिवलीतील राजकारणात बदलाचे वारे**

योगेंद्र भोईर यांचा ठाकरे गटात प्रवेश हा फक्त एका नेत्याचा पक्षबदल नसून, डोंबिवलीच्या राजकारणात नव्या समीकरणांची सुरुवात मानली जात आहे. भाजपच्या स्थानिक संघटनांवरही याचा प्रभाव पडू शकतो, असा अंदाज राजकीय वर्तुळात व्यक्त केला जात आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा पक्षांतरांचा लोंढा अजून वाढणार की नवी उलथापालथ होणार, हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.

## एमआयडीसीच्या कोट्यवधींच्या भूखंडांवर भंगारमाफियांचे अतिक्रमण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशी :** नवी मुंबईतील टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील दिघा महापे मार्गावर उच्च दाबाच्या विद्युत वाहिनीखाली असलेल्या एमआयडीसीच्या कोट्यवधी रुपयांच्या भूखंडांवर भंगार व्यावसायिकांनी मोठे अतिक्रमण करून ते भूखंड गिळंकृत केले आहेत. एमआयडीसीने यापूर्वी अनेकदा कारवाई करून अतिक्रमण हटवले असले तरी कारवाईनंतर भंगारविक्रेते पुन्हा त्याच ठिकाणी आपले बस्तान मांडतात. गवतेवाडी, चिंचपाडा, यादवनगर परिसरातील मुख्य रस्त्यालगत, जलवाहिनी आणि उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांखालच्या भूखंडांवर हे अतिक्रमण झाले आहे.

मध्यंतरी गवतेवाडीत कारवाई करून एमआयडीसीने पत्रे लावून भूखंड संरक्षित केला होता, पण भूमाफियांनी ते कुंपण तोडून पुन्हा झोपड्या आणि भंगारची दुकाने थाटली. भंगारविक्रेत्यांनी कारवाई टाळण्यासाठी राजकीय नेत्यांच्या आशीर्वादाने 'एकता नगर झोपडपट्टी गृहनिर्माण संस्था' बनवून अतिक्रमण अधिकृत दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. या भंगार व्यवसायामुळे शहराचे विद्रूपीकरण होत असून, रात्रीच्या वेळी या भागातून प्रवास करणे धोकादायक बनले आहे. काही दिवसांपूर्वी याच परिसरातील एका भंगार गोदामाला आग लागण्याचा प्रकारही घडला होता. एमआयडीसीच्या दुर्लक्षामुळे कोट्यवधींचे भूखंड भंगारमाफियांनी ताब्यात घेतल्याचा हा गंभीर प्रकार आहे. एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता एस. पी. आव्हाड यांनी यासंदर्भात सांगितले, की भूखंडांवर अतिक्रमणाची पाहणी करून तातडीने कारवाई करण्यात येईल.

## नगराध्यक्षपदाच्या तीन उमेदवारांची माघार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा :** नगरपंचायतीच्या निवडणुकीत शुक्रवार (ता. २१) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार रिद्धी भोईर आणि रंजिता पाटील यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. याव्यतिरिक्त नगरसेवकपदाच्या सहा अपक्ष उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली.

वाडा नगरपंचायत निवडणुकीसाठी नगराध्यक्षपदासाठी सात वैध उमेदवारी अर्ज दाखल होते. त्यापैकी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या उमेदवार रिद्धी भोईर व रंजिता पाटील, तसेच अपक्ष उमेदवार ज्योती आघाव या तिघींनी अर्ज मागे घेतल्याने आता नगराध्यक्ष पदाकरिता चार उमेदवार रिंगणात राहिले आहेत. १७ प्रभागांमध्ये नगरसेवक पदाकरिता ७४ वैध उमेदवारी अर्ज होते. त्यापैकी सुनिता जाधव (प्रभाग क्रमांक २), रोहन पाटील (प्रभाग १०), कुणाल साळवी (प्रभाग १२), अजहर शेख (प्रभाग १३), ज्योती आघाव (प्रभाग १५), विराज पाटील (प्रभाग १६) यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. त्यामुळे १७ प्रभागांत ६८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस आपले बळ कोणाच्या पाठीशी उभे करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.







## बुलेट ट्रेन प्रकल्पाविरोधात भरडी ग्रामस्थांचे साखळी उपोषण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**सापाड :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे होणाऱ्या गंभीर परिणामांचा तीव्र विरोध करत भरडी गावातील बाधित ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. सोमवारी सकाळपासूनच गावातील शेकडो ग्रामस्थांनी साखळी उपोषणासोबत कामबंद आंदोलनाला सुरुवात केली. गावाचा मुख्य रस्ता, शाळा, आरोग्य केंद्र, बाजारपेठ या दैनंदिन जीवनाशी निगडित अत्यंत महत्त्वाच्या मार्गावर प्रकल्पाचा मोठा परिणाम होणार असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. बुलेट ट्रेनचा मार्ग भरडीसह आजूबाजूच्या गावांच्या सीमारेषेवरून जाणार असल्याने विद्यार्थ्यांचा शाळेत जाण्याचा मुख्य मार्गच कायमस्वरूपी बंद होण्याच्या मार्गावर आहे. दररोज पायी किंवा सायकलने शाळेत जाणारे विद्यार्थी या मार्गाचा एकमेव वापर करतात. तोच मार्ग बंद झाल्यास विद्यार्थ्यांना मोठ्या वळणमार्गे शाळा गाठावी लागणार असून, त्याचा शिक्षणावर, सुरक्षिततेवर आणि वेळेवर गंभीर परिणाम होईल, असा आरोप पालकांनी केला आहे.



प्रकल्पाच्या सुरुवातीपासूनच त्यांनी प्रशासन आणि बुलेट ट्रेन प्रकल्प अधिकाऱ्यांकडे भुयारी मार्गासाठी वारंवार मागणी केली होती. मात्र त्याकडे सातत्याने दुर्लक्ष केले गेले. 'रोजच्या वापराचा मुख्य मार्ग बंद करून आमचे आयुष्य ठप्प करणार असाल, तर आम्ही कसे गप्प बसू ?" असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी आंदोलनस्थळी उपस्थित अधिकाऱ्यांना केला. केवळ विद्यार्थ्यांचा रस्ता नव्हे, तर आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय, दवाखाने, तसेच बाजारपेठेत जाण्यासाठी ग्रामस्थ वापरत असलेला मार्गदखील या प्रकल्पामुळे अडथळ्यात येत आहे. दुकाने, कार्यालये, शाळा, तसेच वाहतूक व्यवस्था मोठ्या प्रमाणात ठप्प झाली आहे. ग्रामस्थांनी एकत्र येत गावठाणात 'साखळी उपोषण' सुरू केले आहे. गावातील महिलाही मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाल्या असून, त्यांनी प्रकल्प प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली आहे.



# गरम मसाला बनवण्याचं परफेक्ट प्रमाण आणि पद्धत



बहुतांश घरांमध्ये वर्षभरासाठी लागणारा गरम मसाला असतोच.. पण तरीही कधी कधी त्याच त्या चवीच्या भाज्या खाण्याचाही कंटाळा येतो. चवीमध्ये काहीतरी बदल हवा असतो. त्यामुळे मग आपण विकत मिळणारे मसाले आणतो आणि त्यांच्या मदतीने भाज्यांना चव आणण्याचा प्रयत्न करतो. पण या मसाल्यांमध्येही केमिकल्स, प्रिझर्व्हेटीव्ह असतात असं म्हटलं जातं. म्हणूनच असे मसाले कधीतरी वापरायला ठिक आहेत. पण रोजच्या रोज मात्र त्यांचा वापर टाळायलाच हवा. त्यासाठी एका खास पद्धतीने इंस्टंट गरम मसाला घरात तयार करून ठेवा. अगदी एक चमचा जरी हा मसाला भाज्यांमध्ये घातला तरी तुमच्या रोजच्याच भाज्यांना खूप छान चव येईल.

इंस्टंट गरम मसाला

**तयार करण्याची रेसिपी**

**साहित्य**

२ चमचे धणे १ चमचा जिरे अर्धा चमचा बडिशेप आणि पाव चमचा मेथी दाणे २ मोठ्या वेलची आणि १ लहान वेलची १ ते दिड इंच दालचिनीचा तुकडा

**कृती**

घरच्याघरी अगदी सोप्या पद्धतीने इंस्टंट गरम मसाला तयार करण्यासाठी गॅसवर एक कढई किंवा तवा गरम करायला ठेवा.

तवा चांगला गरम झाल्यानंतर त्यामध्ये वरील सगळे पदार्थ घाला आणि मध्यम आचेवर खमंग भाजून घ्या.


भाजताना गॅस मोठा करू नये, अन्यथा मसाले जळू शकतात.

नंतर गॅस बंद करा आणि भाजून घेतलेले मसाले पुर्णपणे थंड होऊ द्या. थंड झालेले मसाले मिक्सरमधून अगदी बारीक फिरवून घ्या. हा मसाला जेवढा बारीक कराल तेवढा त्यातल्या पदार्थांचा स्वाद खुलत जाईल. आता हा तयार केलेला मसाला १५ दिवस तरी अगदी छान टिकतो. नेहमीप्रमाणे भाजीमध्ये लाल तिखट, मसाले घालतो तसा हा घालावा. एकदा चाखून पाहा. घरातल्या सगळ्यांनाही भाज्यांच्या चवीमध्ये झालेला बदल खूप आवडेल.



# आधुनिक भारतीय विज्ञानातील पहिले वैज्ञानिक संशोधक

जगदीशचंद्र बोस यांचे नाव आधुनिक भारतीय विज्ञानातील) पहिले वैज्ञानिक संशोधक म्हणून घेतले जाते. 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि 20 व्या शतकाच्या सुरुवातीस, बोस यांनी त्यांच्या योगदानाने देशाला विज्ञानाच्या जगात जागतिक स्तरावर आणले. भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, जीवशास्त्र या विषयांना भारतीय संस्कृतीशी जोडण्याचे काम त्यांनी केलं आहे. विज्ञान साहित्यात योगदान देताना सर्वसामान्यांनाही विज्ञानाची ओळख करून घेण्याची संधी मिळाली. त्यांना रेडिओ कम्युनिकेशनचे जनक म्हणून ओळखले जाते. 30 नोव्हेंबर रोजी त्यांच्या वाढदिवसानिमित्त देश त्यांचे स्मरण करत आहे. सुरुवातीचे शिक्षण गावात जगदीश चंद्र बोस यांचा जन्म 30 नोव्हेंबर 1858 रोजी ब्रिटीश राजवटीत असलेल्या पूर्व बंगालमधील मेमनसिंग येथील ररौली गावात झाला, जो आता बांगलादेशात आहे. त्यांचे वडील भगवानचंद्र बसू हे ब्रह्म समाजाचे नेते होते आणि ब्रिटिश राजवटीत अनेक ठिकाणी डेप्युटी मॅजिस्ट्रेट किंवा सहाय्यक आयुक्त होते. बोस यांचे प्रारंभिक शिक्षण त्यांच्या वडिलांनी स्थापन केलेल्या त्याच गावातील शाळेत झाले. लहानपणापासून जीवशास्त्रात रस लहानपणापासूनच बोस यांना निसर्गाच्या सानिध्यात राहण्याची खूप आवड होती. यानिमित्ताने त्यांची जीवशास्त्रातील आवड



जगदीशचंद्र बोस

जागृत झाली. वयाच्या 11 व्या वर्षी ते कलकत्त्याला आले आणि त्यांनी सेंट झेवियर्स शाळेत प्रवेश घेतला. यानंतर ते लंडनला वैद्यकीय शास्त्राचे शिक्षण घेण्यासाठी गेले. परंतु प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांनी डॉक्टर होण्याचा आपला इरादा सोडला आणि केंब्रिज कॉलेजमध्ये प्रवेश घेतला, जिथे त्यांनी भौतिकशास्त्राचा अभ्यास केला.

शिकवण्याचे समर्पण बोस 1885 मध्ये भारतात आल्यानंतर प्रेसिडेन्सी कॉलेज, कलकत्ता येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून शिकवू लागले. इंग्रजी प्राध्यापकांच्या तुलनेत भारतीय प्राध्यापकांच्या कमी पगाराला विरोध केल्याने त्यांनी तीन वर्षे विना वेतन अध्यापन केले, पण त्यांनी शिकवणे सोडले नाही. बोस यांचे काही विद्यार्थी जसे सतेंद्र नाथ बोस नंतर प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ बनले. वनस्पतीत जीवन आहे जगदीशचंद्र बोस यांनी कॅस्कोग्राफ नावाच्या उपकरणाचा शोध लावला. ते परिसरातील विविध लहरी मोजू शकत होते. पुढे त्यांनी प्रयोगातून सिद्ध केले की झाडांमध्ये आणि वनस्पतींमध्ये जीवन असते. ते सिद्ध करण्याचा हा प्रयोग रॉयल सोसायटीत झाला आणि त्याच्या या शोधाचे जगभरात कौतुक झाले. रेडिओ कम्युनिकेशनचे जनक वैज्ञानिक विभागात असे मानले जाते की बोस यांच्या वायरलेस रेडिओसारख्या उपकरणातूनच रेडिओ विकसित केला गेला. पण स्वतःच्या नावावर पेटंट झाल्यामुळे रेडिओच्या शोधाचे श्रेय इटालियन शास्त्रज्ञ जी. मार्कोनी यांना जाते. मार्कोनी यांना या शोधाबद्दल 1909 चा भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले. बोस आणि उपनिषद गुरुदेव रवींद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद आणि सिस्टर निवेदिता यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वांवर प्रभाव टाकणाऱ्या वेद आणि उपनिषदांना बोस यांनी वैज्ञानिक बाजू दिली. भगिनी निवेदिता यांनी त्यांचे 'रिस्पॉन्स इन द लिव्हिंग अँड नॉन-लिव्हिंग' हे उपनिषद आधारित विज्ञानावरील प्रसिद्ध पुस्तक संपादित केलं. निवेदिता आणि टागोर यांच्यातील पत्रव्यवहारावरून असे दिसून येते की, निवेदितांनी वेद आणि उपनिषदांचा बराच अभ्यास केल्यानंतर बोस यांच्या ग्रंथांचे संपादन केलं. बोस यांना बंगाली विज्ञान साहित्याचे जनक देखील म्हटले जाते. 1896 मध्ये, बोस यांनी निरुद्देशर कथा लिहिली जी एक छोटी कथा होती. परंतु, 1921 मध्ये त्यांच्या अभ्यक्त संकलनाचा भाग बनली. 1917 मध्ये त्यांना नाइटहूड ही पदवी देण्यात आली, त्यानंतर बोस सर जगदीश चंद्र बोस म्हणून ओळखले जाऊ लागले. 23 नोव्हेंबर 1937 रोजी वयाच्या 78 व्या वर्षी त्यांचे निधन झाले.

# वाढत्या प्रदूषणामुळे दुहेरी हवामान संकट

मुंबईकरांना सध्या तापमानात मोठी घट पाहायला मिळत आहे. त्यासोबतच आता मुंबईत प्रदूषणही वाढले आहे. त्यामुळे सध्या मुंबईकरांना दुहेरी हवामान संकटाचा सामना करावा लागत आहे. सध्या मुंबई शहरात सर्वत्र धूरकट वातावरण पाहायला मिळत आहे. त्यामुळे हवेचा गुणवत्ता निर्देशांक (AQI) धोकादायक पातळीवर पोहोचला आहे. यामुळे मुंबईकरांच्या आरोग्याच्या समस्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सध्या मुंबईचा हवेचा गुणवत्ता निर्देशांक (AQI) १७६ वर पोहोचला आहे. याचा अर्थ सध्या मुंबईतील हवा असमाधानकारक आहे. अनेक उपनगरांमध्ये हा आकडा २०० च्याही पुढे गेला आहे, ज्यामुळे नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होताना दिसत आहेत. बांधकाम, वाहनांचा धूर आणि कमी वाऱ्यामुळे प्रदूषक घटक जमिनीच्या जवळ अडकून राहिले आहेत. वाढलेले प्रदूषण आणि हवेतील गारठा यामुळे श्वसनाचे त्रास असलेल्या लोकांसाठी ही परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे.

एकीकडे प्रदूषणाची समस्या असताना, दुसरीकडे मुंबईत गारठा चांगलाच वाढला आहे. गेल्या काही दिवसांपासून मुंबईत



### हवेचा गुणवत्ता निर्देशांक (AQI) धोकादायक पातळीवर असून, तापमानात लक्षणीय घट

रात्री किमान तापमान सुमारे २१ अंश सेल्सियस नोंदवण्यात येत आहे. हे तापमान सध्याच्या नोव्हेंबर महिन्याच्या सरासरी तापमानापेक्षा तब्बल पाच अंशांनी कमी आहे. हवामान विभागाने (IMD) दिलेल्या माहितीनुसार, १९ नोव्हेंबरपर्यंत तापमानातील ही घट कायम राहण्याची शक्यता आहे. मुंबई उपनगरांमध्ये विशेषतः सांताक्रूझ वेधशाळेत हा पारा १६ अंश सेल्सियसच्या आसपास नोंदवण्यात आला आहे. त्यामुळे यंदा मुंबईकरांना नोव्हेंबरमध्येच हिवाळ्यातच हुडहुडी भरल्याचे दिसत आहेत.

**थंडी वाढण्याचे कारण काय?**

सध्या जाणवणारी ही थंडी प्रामुख्याने मध्य आणि उत्तर भारतातून मुंबईकडे वाहणाऱ्या उत्तरी आणि ईशान्य दिशेच्या थंड वाऱ्यांमुळे आहे. या वाऱ्यांमुळे मुंबईच्या वातावरणात थंड आणि कोरडी हवा प्रवेश करत असून, त्यामुळेच तापमानात ही तात्पुरती घट झाली आहे. मात्र, हवामान तज्ञांच्या मते, येत्या काही दिवसांत वाऱ्याची दिशा बदलल्यास तापमान पुन्हा वाढण्याची शक्यता आहे.

**नागरिकांसाठी सूचना**

या दुहेरी हवामान संकटामुळे डॉक्टरांनी श्वसनाचे आजार (Respiratory Issues), दमा (Asthma) आणि हृदयविकार असलेल्या रुग्णांना विशेष काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे

**मॉर्निंग वॉक टाळा:** सकाळी लवकर आणि रात्री उशिरा घराबाहेर पडणे टाळावे, कारण या वेळी तापमान कमी आणि प्रदूषणाची पातळी (AQI) सर्वाधिक असते.

**मास्कचा वापर:** प्रदूषित भागात जाताना N95 मास्क वापरावा.

उबदार कपडे: थंडीपासून बचाव करण्यासाठी गरम कपड्यांचा आणि स्वेटरचा वापर करावा.

**पाणी:** शरीरातील पाण्याची पातळी योग्य राखण्यासाठी भरपूर पाणी प्यावे.

# महिला उमेदवाराच्या कारला भीषण अपघात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ** : निवडणुकीचा प्रचार संपवून परत निघालेल्या एकनाथ शिंदेंच्या अंबरनाथ नगरपरिषदेच्या महिला उमेदवार किरण चौबे यांच्या गाडीला भीषण अपघात झाला. या अपघातात चार जणांना मृत्यू झाला असून तीन जण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. अंबरनाथ उड्डापूलावर घडलेल्या हा अपघात सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे.



किरण चौबे या बुवापाडा प्रभागातून निवडणूक लढत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार त्या प्रचार संपवून कारने परत जात होत्या. मात्र, अंबरनाथ उड्डानपूलावर कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने त्याने तीन ते चार दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातामध्ये अंबरनाथ महापालिकेचे दोन कर्मचारी शैलश जाधव आणि चंद्रकांत अनर्थे तसेच कारचालक लक्ष्मण शिंदे यांच्यासह पादचारी सुमित चेलानी यांचाही या अपघातामध्ये मृत्यू झाला.काही मीडिया रिपोर्टनुसार कारचा चालक लक्ष्मण शिंदे याला हृदयविकाराचा झटका आल्याने त्याचे गाडीवरचे नियंत्रण सुटले त्यामुळे हा भीषण अपघात घडला. दरम्यान, या अपघाताचा अधिक तपास अंबरनाथ चालू आहे. उड्डापूलावरून एक जण खाली पडला अपघाताचा सीसीटीव्ही समोर आला आहे. त्यामध्ये स्पष्ट दिसत आहे की वेगाने येणाऱ्या कारने समोरच्या तीन ते चार दुचाकांनी जोरदात धडक दिली. ही धडक इतकी भयंकर होती की कार जाग्यावर पलटी झाली तर एक जण उड्डानपूलावरून खाली पडताना दिसत आहे.

# सुरेश भोईर यांचा उबाठा पक्ष प्रवेशाचा भाजपावर शून्य प्रभाव

**– शक्तिवान भोईर**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** टिटवाळा येथील माजी नगरसेवक सुरेश भोईर यांनी मोठा गाजावाजा करून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. मात्र त्यांच्या या प्रवेशाने भारतीय जनता पार्टीवर काही एक परिणाम झाला नसून त्यांच्या या प्रवेशाचा भाजपावर शून्य प्रभाव असल्याची टीका भारतीय जनता पार्टी टिटवाळा मंडळ अध्यक्ष शक्तिवान भोईर यांनी केली आहे.

शुक्रवारी सुरेश भोईर यांनी शिवसेना ठाकरे गटात पक्षात प्रवेश करताना काही चुकिचे वक्तव्य केले असून त्यांनी असे भासवण्याचा प्रयत्न केला आहे कि ते म्हणजेच भाजपा आणि त्यांच्यामुळेच टिटवाळा येथे भाजपाचे नगरसेवक निवडून येतात. गेल्यावेळी त्यांनी महानगरपालिकेची निवडणूक लढवली होती आणि त्या निवडणुकित त्यांना लोकांनी किती मते देऊन स्विकारले होते हे टिटवाळा परिसरातील नागरिकांना माहित आहे. त्यामुळे या प्रवेशाच्या निमित्ताने पुढे खोटी माहिती पसरविण्यात येत असल्याचे शक्तीवान भोईर यांनी सांगितले.

आता येऊ घातलेल्या मनपा निवडणुकीत चार वार्ड मिळुन पॅनल पध्दती आली आहेत. टिटवाळा पॅनल क्रमांक ३ असा झाला असून यात वार्ड क्र.७, ८, ९ आणि १० मिळुन पॅनल क्र.३ झाला आहे. यामध्ये पॅनल क्र.३ अ, ब, क आणि ड अशी रचना असुन अ, ब, क हे आरक्षित तर




ड मध्ये सर्वसाधारण आरक्षण पडले आहे. यावेळी मागच्या वेळी पडलेली अपमानजनक मते आणि झालेला दारुण पराभव याचा विचार करता पक्षाकडून उमेदवारी मिळेल हा विश्वास नसल्याने सुरेश भोईर यांनी ठाकरे गटात प्रवेश केला आहे. हा प्रवेश करताना त्यांच्याकडून चुकीची माहिती दिली जात असून त्यांच्या पुत्रमोहापायी उबाठा पक्ष प्रवेशाच्या घेतलेल्या निर्णयाला शक्तिवान भोईर यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

२००० साली शक्तिवान भोईर भारतीय जनता पार्टीचे यादी प्रमुख होते. त्यावेळी सुरेश भोईर यांनी वॉर्ड क्रमांक १ मांडा टिटवाळा या प्रभागतून निवडणूक लढवली होती आणि त्यावेळी सर्व कार्यकर्त्यांनी त्यांना निवडून आणले. त्यानंतर ते पुन्हा २००५ निवडणूक लढले पण त्यांचा त्यावेळी पराभव झाला. त्यानंतर सन २००९ साली शक्तिवान भोईर वार्ड क्रमांक ५ चे अध्यक्ष झाले. निवडणुकीच्या अनुषंगाने त्यांची कामे सुरु होती. २०१० ला कल्याण डोंबिवली महापालिकेची निवडणूक लागली त्यामध्ये वार्ड क्रमांक ५ मांडा पश्चिम मध्ये एसटी आरक्षण पडलं आणि वॉर्ड क्रमांक ९ टिटवाळा मध्ये महिला आरक्षण पडलं त्याच्यामुळे शक्तिवान भोईर यांच्या पत्नीला म्हणजेच उपेक्षा भोईर यांना निवडणूकिमध्ये सर्व कार्यकर्त्यांच्या इच्छेनुसार पक्षाने निवडणुकीमध्ये उभे केले. त्यावेळी सुरेश भोईर यांची हृदयविकार सर्जरी झाल्यामुळे ते बेडरेस्ट असल्यामुळे निवडणुकीच्या प्रक्रियेत नव्हते. त्यावेळेस सर्व पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मिळून उपेक्षा भोईर यांना निवडून आणले.

त्यानंतर ऊपेक्षा भोईर यांनी चांगली कामे केल्याने २०१५ मध्ये वार्ड क्रमांक ९ मांडा पूर्व मधुन पुन्हा निवडून आल्या तर वार्ड क्रमांक १० मध्ये सुरेश भोईर यांचा मुलगा प्रदीप भोईर याला देखील निवडणूक लढवायची होती. परंतु पक्ष प्रदीप भोईर यांना तिकीट देखील देत नसतांना शक्तिवान भोईर यांच्या सांगण्यावरुन पक्षाने त्यांना उमेदवारी दिली होती. परंतु सुरेश भोईर यांचा मुलगा प्रदीप भोईर हा २०१५ च्या निवडणुकीत मोठ्या फरकाने पराभुत झाले. त्याचा राग मनात ठेऊन त्यांनी शक्तिवान भोईर यांच्या तसेच पक्षाच्या कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्याशी भांडणे चालु केली होती. तेव्हा पासून त्यांचा आमच्या बाबत आकस असून त्यांच्या जाण्याने भाजपाला काही फरक पडत नसल्याचे शक्तिवान भोईर यांनी सांगितले.

# अर्णव खैरेच्या आत्महत्येस कारणीभुत आरोपींना शिक्षा द्या

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिवादन समितीची पोलिसांकडे मागणी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** लोकल ट्रेनमध्ये झालेल्या वादातून कल्याण पूर्वेतील अर्णव खैरे या १९ वर्षीय विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर तीव्र पडसाद उमटत असून अर्णवच्या आत्महत्येस कारणीभूत असलेल्या लोकांना शिक्षा देण्याची मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिवादन समितीने केली आहे. याबाबत समितीच्या वतीने कल्याण लोहमार्ग पोलिसांना निवेदन दिले आहे.

कल्याण पुर्वेतील सहजीवन वसाहतीत राहणारा १९ वर्षीय अर्णव खैरे या विद्यार्थ्याला १८ नोव्हेंबर रोजी ट्रेनमध्ये काही अज्ञात मुलांच्या टोळक्याने मराठी बोलण्याच्या वादातुन विनाकारण मारहाण केली. त्यामुळे मानसिक तणावात जाऊन अर्णव खैरे या विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याचा आरोप त्यांच्या वडिलांनी केला आहे. या आत्महत्येस जवाबदार असलेल्या अज्ञात मुलांच्या टोळक्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून कठोरात कठोर शिक्षा करावी अशी मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिवादन समितीने केली आहे. यावेळी समितीचे अध्यक्ष हरिभाऊ भालेराव, सचिव विजय पवार, खजिनदार मंगेश इंगळे, केतन रोकडे, संजय तेलुरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# तरुणाची कुटुंबाला मारहाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर:** कॅम्प नं-१, मधील रस्त्यावरून जाणाऱ्या एका तरुणीचा विनयभंग करून याचा जाब विचारणाऱ्या कुटुंबाला मारहाण केली. मारहाणीचा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून याप्रकरणी उल्हासनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.एक तरुणी जात असताना अंश करोतीया या तरुणाने तिला डिचविले. तसेच तरुणीचा विनयभंग करून मारहाण केली. याचा जाब विचारायला गेलेल्या कुटुंबीयांनी अंश आणि त्याच्या कुटुंबीयांनी मारहाण केली. हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला. तरुणीच्या कुटुंबानी उल्हासनगर पोलिसाकडे दाद मागून तक्रार दाखल केल्यावर, पोलिसांनी अंश करोतीया याच्यासह कुटुंब सदस्यावर गुन्हा दाखल केला.

# व्यापाऱ्याची एक लाखाची फसवणूक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी:** तीन महिलांनी तरुणाला लग्नाचे आमिष दाखवून त्याच्याकडून ऑनलाइन पैसे उकळून फसवणूक केल्याची घटना टेमघर गावात घडली. याप्रकरणी तीन महिलांच्या विरोधात शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अरमीना दिदी, रिया सरकार (दोघी रा. पश्चिम बंगाल), रुस्तम मंडल (रा. भिवंडी) अशी गुन्हा दाखल झालेल्या महिलांची नावे आहेत. रईस जहीर खान (४८) हा व्यापारी टेमघर गावात राहत असून वरील तीन महिलांनी आपसात संगनमताने रईसला आम्ही तुझ्याशी लग्न करतो असे सांगून वेगवेगळ्या तारखेला वेगवेगळ्या कारणांसाठी १ लाख ८ हजार ७०० रुपये ऑनलाइन घेऊन लग्न न करता रईसची आर्थिक फसवणूक केली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच रईसने शांतीनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.




# भविष्यवेध



रविवार

२३ नोव्हेंबर २०२५

**मेष**

तुमचे काम पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित कराल आणि तुमचे बहुतेक प्रयत्न यशस्वी होतील. नवीन वाहन खरेदी करण्याबाबत तुम्ही उत्साहित असाल.

**वृषभ**

तुम्हाला वडिलांच्या सेवांचा फायदा होईल आणि त्यांचे आशीर्वाद तुमच्या आयुष्यातील कोणत्याही चालू समस्या सोडवण्यास मदत करतील.

**मिथुन**

तुमची स्वप्ने लवकरच पूर्ण होतील. तुमचे वैवाहिक जीवन आज आनंदी राहील आणि तुमची मुलेही मनापासून अभ्यास करतील. ध्यात्मात थोडा वेळ घालवाल.

**कर्क**

मनाला शांती मिळेल. दीर्घकाळापासून असलेल्या समस्येतून आराम मिळेल. नवीन रोजगाराच्या संधी मिळतील. मोठा वैयक्तिक निर्णय घेऊ शकता.

**सिंह**

मोठ्या कंपनीकडून नोकरीची ऑफर मिळेल आणि तुम्ही तुमची मुलाखत यशस्वी कराल. तुम्हाला एका शारीरिक समस्येपासून मुक्तता मिळेल.

**कन्या**

तुम्ही एक नवीन टप्पा गाठण्यात यशस्वी व्हाल आणि प्रशंसा केली जाईल. तुमचे कनिष्ठ विद्यार्थी देखील तुमच्याकडून शिकण्याचा प्रयत्न करतील.

**तुळ**

सामाजिक कार्यात सहभागी व्हाल, ज्यामुळे तुमची प्रतिमा उंचावेल. या राशीच्या अविवाहित लोकांना लग्नाचा प्रस्ताव येऊ शकतो.

**वृश्चिक**

सरकारी योजनेचा लाभ घेण्यास यशस्वी व्हाल. तुम्ही मालमत्तेत गुंतवणूक करण्याची योजना आखू शकता. तुम्ही एखाद्या व्यापाऱ्याशी करार करू शकता.

**धनु**

शांत मनाने आणि गांभीर्याने तुम्ही हाती घेतलेले कोणतेही काम तुम्हाला नक्कीच यश देईल. तुमचे काम पुढे नेण्यासाठी तुम्ही एक नवीन शाखा उघडू शकता.

**मकर**

तुम्ही काळाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न कराल, जे तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. व्यवसाय भरभराटीला येईल आणि तुमच्या भौतिक सुखसोयी वाढतील.

**कुंभ**

तुमचे आरोग्य चांगले राहील आणि तुम्ही उर्जेने परिपूर्ण असाल. आज तुम्ही मित्रांसोबत बाहेर जाण्याची योजना आखू शकता, जी तुम्हाला आनंद देईल.

**मिन**

कोणाला उधार दिलेले पैसे तुम्हाला परत मिळतील. विचार न करता कोणत्याही गोष्टीवर प्रतिक्रिया देऊ नका. यामुळे तुमचे नातेसंबंध बिघडू शकतात.

# मृत्यूच्या दाढेतून सुखरूप बचावलेल्या हमदानची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली भेट

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : दैव बलवत्तर म्हणून सुखरूप वाचलेल्या दोन वर्षाच्या हमदान मोहम्मद या दोन वर्षांच्या चिमुकल्याची काल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातील ज्यूपिटर रुग्णालयात जाऊन भेट घेतली. यावेळी त्यांनी लहानग्या हमदानच्या तब्येतीची आस्थेने विचारपूस केली. यावेळी त्याच्या कुटुंबियांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे साश्रू नयनांनी आभार मानले.

ठाण्यातील राबोडी येथे राहणारा हमदान हा दोन दिवसांपूर्वी आपल्या आजीकडे आला होता. तिथून पुन्हा घरी जाताना रिक्षा चालक असलेले त्याचे वडील गफूर मोहम्मद यांनी त्याला ठाणे पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणाऱ्या ध्यानसाधना महाविद्यालया जवळील अंडरपास पाशी बोलावले. वडिलांना पाहून आजीचा हात सोडून धावत सुटलेला हमदान त्याच वेळी आनंद नगर नाल्यातील पाण्याचा उपसा करण्यासाठी मेनहॉलवर लावलेल्या पाईपवर पाय पडल्याने थेट २५ फूट खोल गटारात जाऊन पडला. स्थानिक नागरिकांनी याबाबत आरडाओरडा करून त्याला बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू केले. यावेळी त्यांनी तत्काळ शिवसेनेचे माजी नगरसेवक विकास रेपाळे आणि माजी नगरसेविका नम्रता भोसले जाधव यांना तिथे पाचारण केले. त्यांनी तत्काळ आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना बोलवून अथक प्रयत्न करून हमदानला बाहेर काढले. मात्र नाका तोंडात गटाराचे दूषित पाणी गेल्यामुळे तसेच गटारात त्याचा श्वास गुदमरल्यामुळे तो अत्यवस्थ झाला होता. त्यावेळी तत्काळ त्याला ठाण्यातील सिव्हिल रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

मात्र त्याची तब्येत वेगाने ढासळत असल्याचे पाहून विकास रेपाळे आणि नम्रता जाधव- भोसले यांनी तत्काळ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना फोन करून तत्काळ त्यांच्या कानावर ही बाब घातली, त्यावेळी क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी हमदानला पुढील उपचारासाठी ठाण्यातील ज्यूपिटर रुग्णालयात दाखल करायला सांगितले. तसेच रुग्णालयातील डॉक्टरांना फोन करून त्याला वाचवण्यासाठी सर्वार्थाने प्रयत्न करावे यासाठी विनंती केली.

डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केल्याने आणि खाजगी रुग्णालयात वेळेवर

## ठाण्याच्या ज्युपिटर रुग्णालयात जाऊन शिंदेंनी चिमुकल्या हमदानची घेतली भेट

चांगले उपचार मिळाल्याने हमदानचा जीव वाचला. काल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातील ज्यूपिटर रुग्णालयात जाऊन स्वतः हमदानची भेट घेतली, तसेच डॉक्टरांकडून त्याची तब्येत कशी आहे ते जाणून घेतले. हमदानची तब्येत आता पूर्णपणे बरी असून नाका तोंडात दूषित पाणी गेल्याने झालेला न्युमिनिया देखील आता आटोक्यात आला आहे. संकटकाळी मदतीला धावून येत आपल्या मुलाचा जीव वाचवल्याबद्दल हमदानच्या आई वडिलांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले. तसेच वेळेत त्यांच्यापर्यंत ही बाब पोहचवून आपल्या मुलाला नवीन जीवदान मिळवून दिल्याबद्दल माजी नगरसेवक विकास रेपाळे आणि माजी नगरसेविका नम्रता भोसले-जाधव यांचेही त्यांनी आभार मानले आहेत.

संकटकाळी धावून जाणे हे माणुसकी म्हणून आपले कर्तव्य होते, शिवसेना ही मदतीसाठी कायम पुढे धावून जाते, असे उपमुख्यमंत्री शिंदे अनेकदा आपल्या भाषणात सांगतात. मात्र लहानग्या हमदानच्या मदतीसाठी ते धावून गेल्याने त्यांच्या संवेदनशील स्वभावाचा प्रत्यय पुन्हा एकदा पाहायला मिळाला आहे.

# जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांची माहिती होणार डिजिटल

**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**

**ठाणे** : ठाणे जिल्हा परिषदेने डिजिटल प्रशासनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके ऑनलाइन एकात्मिक प्रणालीद्वारे डिजिटल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या उपक्रमामुळे आता कर्मचाऱ्यांची संपूर्ण सेवा माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. आतापर्यंत तब्बल तीन हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके डिजिटल करण्यात आली असून, उर्वरित प्रक्रियाही सुरू आहे.



ठाणे जिल्हा परिषदेच्या 17 विभाग आणि पाच पंचायत समित्यामध्ये 4 हजार 522 अधिकारी, कर्मचारी वर्ग कार्यरत आहे. या कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके अद्ययावत नसल्यामुळे पदोन्नती, बदली, रजा आणि सेवाविषयक लाभांच्या प्रक्रियेत अनेकदा विलंब होत असे. मात्र, या डिजिटल उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांची वैयक्तिक सेवा माहिती सुरक्षितपणे संग्रहीत होणार असून, सर्व नोंदी एकाच ठिकाणी तत्काळ उपलब्ध राहणार आहेत. परिणामी कामकाजाचा वेग वाढून प्रशासनिक पारदर्शकता अधिक बळकट होईल.

या प्रणालीद्वारे प्रत्येक कर्मचाऱ्याला स्वतःचे लॉगिन उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामुळे कुठूनही आणि कधीही स्वतःची माहिती पाहण्याची सुविधा मिळणार आहे. वार्षिक गोपनीय अहवाल, पदोन्नती, प्रशिक्षण, रजा अशा सर्व नोंदी ऑनलाइन अद्ययावत करता येणार असल्याने ठाणे जिल्हा परिषदेच्या 'कागदविरहित' कामकाजाच्या उद्दिष्टाकडे मोठे पाऊल टाकले गेले आहे.

### डिजिटल प्रणालीचे प्रमुख फायदे

- प्रत्येक कर्मचाऱ्याची वैयक्तिक सेवा माहिती सुरक्षितपणे जतन
- पदोन्नती, बदली, रजा आणि प्रशिक्षण नोंदी तत्काळ अपडेट
- वार्षिक गोपनीय अहवालांचे ऑनलाइन मूल्यांकन आणि संग्रह
- कागदविरहित कार्यालयीन कामकाजाला चालना
- कुठूनही लॉगिन करून माहिती पाहण्याची सुविधा

# शेतकऱ्याने कीटकनाशके प्राशन करून संपवले जीवन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : हवामान बदल, ओला-कोरडा दुष्काळ, भात शेती खराब झाली, आंब्याचे पीक हातून गेले किंवा कर्जबाजारीपणामुळे कोकणातील शेतकऱ्याने कधी जीवन संपवले नाही. मात्र मराठवाडा विदर्भातील शेतकऱ्यांप्रमाणे परतीच्या पावसामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावून गेल्याने ठाणे जिल्ह्यातील मुरबाडमधील कर्जबाजारी झालेल्या एका शेतकऱ्याने कीटकनाशके प्राशन करून जीवन संपवले. तसा अहवाल मुरबाड तहसीलदारांनी आज ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना पाठविला आणि ठाणे जिल्ह्यातीलच नव्हे तर कोकणातील दुस-या शेतक-याने जीवन संपवले.

देशातील सर्वाधिक शेतकरी महाराष्ट्रात जीवन संपवत आहेत. कर्नाटक राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे. जानेवारी ते डिसेम्बर 2024 मध्ये महाराष्ट्रात दररोज सरासरी सात प्रमाणे वर्षभरात 2 हजार 706 जणांनी जीवन संपवले. त्यामध्ये मराठवाडा आणि विदर्भातील शेतक-यांनी जीवन संपवल्याची स्थिती चिंताजनक आहे.

कर्ज काढून शेती करण्याचे, लग्न लावण्याचे प्रमाण नगण्य असल्याने अवेळी पाऊस तसेच अतिवृष्टीमुळे पीक वाहून गेले तरी कोकणी शेतकरी जीवन संपवण्याचा मार्ग स्वीकारत नाही. कर्जबाजारी होण्याला कोकणात मान्यता नसल्याने तो जोमाने पुन्हा कामाला लागतो आणि प्रामाणिकपणे काढलेले कर्ज वेळेत चुकता करतो. असे सकारात्मक चित्र कोकणात असताना ठाणे जिल्ह्यात शेतकरी जीवन संपवण्याची गेल्या नऊ वर्षात दुसरी घटना घडली.

# विद्यार्थ्यांनी घेतले सायबर सुरक्षिततेचे धडे




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : मोबाईलचे व्यसन, कमी होत चाललेला प्रत्यक्ष संवाद, सामाजिक आरोग्यावर होणारे परिणाम तसेच सायबर गुन्ह्यांपासून बचाव यांसारख्या विषयांवर नौपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय महाजन साहेबांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

मो. ह. विद्यालय आणि रमेश परमार कनिष्ठ महाविद्यालय, ठाणे येथे दि.22 नोव्हेंबर 2025 रोजी आयोजित सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेचे माजी विद्यार्थी मोरे आणि त्यांची पत्नी कल्पना मोरे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना अतिशय महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. तसेच हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणारा आणि काळाची गरज ओळखणारा ठरेल. असे प्रतिपादन शाळेचे प्राचार्य विकास पाटील यांनी मार्गदर्शन करताना केले.

कार्यक्रमासाठी शाळेच्या उपप्राचार्या अनुराधा कुलकर्णी, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक तथा संचालक मंडळ सदस्य सुनील पाटील, नौपाडा पोलीस स्टेशनचे नितीन शेळके, कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रधान मॅडम यांनी केले. विद्यार्थ्यांना योग्य दिशा देणा ण्यासाठी हा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

# मुद्रांक शुल्काची होणार दर महिन्याला तपासणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ** : मुद्रांक शुल्कामध्ये होणारा घोळ पाहता आता मुद्रांक शुल्क भरल्यानंतर त्याची दर महिन्याला तपासणी केली जाणार आहे. महसूल विभागाची आर्थिक घोळ टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

### दर महिन्याला तपासणी

या दस्ताची तपासणी दर महिन्याला केली जाणार असून, त्यात काही त्रुटी आढळल्यास त्याची लागलीच चौकशी करून कारवाई केली जाणार आहे.

### पाच तारखेपर्यंत दस्त पाठवावे लागणार



दर महिन्याच्या पाच तारखेला मुद्रांक शुल्कात सवलत घेतलेल्या प्रत्येकाला दस्त पाठवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

### अनियमितता आढळल्यास लगेचच होते कारवाई

सवलत घेतलेल्या आणि मुद्रांक शुल्कामध्ये माफी घेतलेल्या दस्तामध्ये अनियमितता आढळल्यास लागलीच कारवाई केली जाणार आहे.

### माफी प्रकरणामुळे नोंदणी व मुद्रांक विभागाला आली जाग

मोठ्या व्यवहारांमध्येही मुद्रांक शुल्काला दिल्या गेलेल्या माफी प्रकरणामुळे आता मुद्रांक शुल्क विभागाने सतर्क होऊन काही कठोर निर्णय घेतले आहेत.

# दुबईत चार पदके पटकावणाऱ्या मयूर भोईरचा शिवसेनेच्या वतीने सन्मान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील माणेरे गावातील रिक्षाचालक संतोष भोईर यांचा मुलगा मयूर भोईर याने दुबई येथे पार पडलेल्या एसबीकेएफ आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पोहणे व धावणे या दोन्ही प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी करत चार पदके जिंकली आहेत. मयूरने स्विमिंगमध्ये २ सुवर्ण + १ कांस्य तसेच ५००० मीटर धावणे १ सुवर्ण अशी एकूण चार पदके मिळवून माणेरे गावासह ठाणे जिल्हा व महाराष्ट्र राज्याची मान उंचावली.



मयूरच्या नेत्रदीपक कामगिरीची माहिती समोर येताच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी त्याचे अभिनंदन करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या होत्या. मयूरचा खेळातील सराव अधिक शास्त्रोक्त व प्रगत पद्धतीने व्हावा, यासाठी शिवसेना डोंबिवली शहर मध्यवर्ती शाखेत आयोजित कार्यक्रमात खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून, आमदार राजेश मोरे यांच्या हस्ते मयूरला अत्याधुनिक सायकल प्रदान करून विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला शिवसेनेचे अनेक महिला व पुरुष पदाधिकारी उपस्थित होते.

# पालघर नगरपरिषद निवडणुकीत काँग्रेसचे प्रीतम राऊत यांचा दमदार प्रचार



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पालघर** : पालघर मध्ये नगरपरिषद निवडणुकांना वेग आला असून काँग्रेस पक्षाकडून नगराध्यक्ष पदासाठी प्रीतम राऊत मैदानात उतरले आहेत. शहरातील विकासकामांचा आढावा घेऊन "पालघरच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस पावले उचलली जातील" असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

सध्या राऊत यांचा प्रचार वेग घेत असून विविध प्रभागांमध्ये भेटी देत नागरिकांशी संवाद साधण्यास त्यांनी सुरुवात केली आहे. नागरिकांच्या अडचणी, स्थानिक पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता आदी महत्त्वाच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रीत करून काम करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

"विकासकामे गतीमान करणे, नागरिकांच्या गरजा ओळखून नियोजनबद्ध कामे करणे असे प्रीतम राऊत यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# पेण नगरपालिका निवडणूकीत सहा उमेदवार बिनविरोध

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : पेण नगरपालिकेची निवडणूक जशी जशी जवळ येत आहे तशी तशी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची स्पर्धा लागलेली दिसून आली. जो तो आपली उमेदवारी अर्ज मागे घेऊन इतर उमेदवारांना बिनविरोध करण्याचा सपाटाच लागलेला पहावयास मिळत आहे. २४ जागांपैकी ६ उमेदवार बिनविरोध झाल्याने उर्वरित १८ जागांसाठी ४६ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. तर नगराध्यक्ष पदासाठी तीन महिला निवडणूक लढवत आहेत.

### ६ उमेदवार बिनविरोध

प्रभाग ९ मधून वसुधा तुकाराम पाटील प्रभाग पाच मधून दीपक जयवंत गुरव प्रभाग ११मधून मालती तुकाराम म्हात्रे, स्मिता पांडुरंग माळी तसेच प्रभाग १२ मधून अभिराज रमेश कडू, सुशीला हरिश्चंद्र ठाकूर या सहा उमेदवारांची निवड बिनविरोध निवड झाली असून पेण शहरांमध्ये आनंदी आनंद निर्माण झालेला पहावयास मिळत आहे.

### ३६ उमेदवारांची माघार

एकंदरीत झालेल्या आज शेवटच्या दिवसापर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची यादीमध्ये ३६ जणांनी नगरसेवक पदाच्या उमेदवारी पासून अर्ज मागे घेतला तर दोन महिलांनी नगराध्यक्ष पदाच्या शर्यतीतून माघार घेतली .खरं पाहता शहरातील ठिकठिकाणी दुरंगी तर काही ठिकाणी तिरंगी लढत होणार असल्याचे दिसून येते.तर प्रभाग ६ मध्ये एका जागेसाठी ६ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत.

त्यामुळे आगामी काळात होणारी पेण नगरपालिकेची निवडणूक ही रंगतदार होणार आहेतच शिवाय नगराध्यक्षा पदासाठी महिला उभ्या आहेत त्यांच्यामध्ये चुरस निर्माण झालेली पहावयास मिळत आहे.

# काटेमानिवली परिसरात दुकानदाराला मारहाण



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : काटेमानिवली परिसरात एका खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या दुकानदाराला अमानुषपणे मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. किरकोळ वादातून ही मारहाण झाल्याची माहिती असून, हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या घटनेचा व्हिडिओ सध्या समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दुकानात आलेल्या काही तरुणांनी किरकोळ कारणावरून दुकानदाराला अचानक मारहाण केली. मारहाण केल्यानंतर संबंधित आरोपी घटनास्थळावरून निघून गेले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मारहाणीत दुकानदाराला किरकोळ इजा झाली असून, त्याला तातडीने प्राथमिक उपचार देण्यात आले. दरम्यान, कोळसेवाडी पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी पुढील कार्यवाही सुरू केली आहे. व्यापाऱ्यांसह नागरिकांनी अशा प्रकारच्या घटनांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# पेण : मायनी प्राथमिक शाळेत पालकांचे श्रमदान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : आजच्या यांत्रिकी युगात श्रमदानाचे दिवस मागे पडत असताना रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मायनी–कोयना येथील पालकांनी एक दिवस संपूर्ण शाळेसाठी उत्स्फूर्त श्रमदान करून आदर्श घालून दिला. शाळा परिसर स्वच्छ करून तसेच संरक्षणभिंतीला रंगरंगोटी करून त्यांनी ग्रामीण समाजासमोर आदर्श "स्वच्छ शाळा सुंदर शाळा" असा संदेश दिला.

या श्रमदानात गावातील माता भगिनी बरोबरच तरुण पालक, आजीआजोबा अशा सर्व स्तरातील पालकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. सर्वांनी हातात कोयते, विळे, फावडी, झाडू, टोपल्या घेऊन शाळेत जमा होऊन सर्वप्रथम शाळेच्या आवारातील काटेरी झुडपे, उंच गवत, रानटी वेली काढून टाकण्यात आल्या. शाळेच्या इमारती लगत वर्षानुवर्षे साचलेला कचरा, प्लास्टिक व इतर घाण वेचून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. त्यामुळे संपूर्ण परिसर चकाचक



व मोकळा झाला.यानंतर शाळेभोवतालच्या संरक्षण भिंतीची रंगरंगोटी करण्यात आली. भिंत स्वच्छ धुऊन त्यावर चुना व रंग देण्यात आला. त्यामुळे शाळेचा बाह्यरंग पूर्णपणे बदलून गेला. शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला व पाहुण्याला स्वच्छतेचा व सुंदरतेचा संदेश मिळावा, हा या कार्यामागचा उद्देश असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली.या उपक्रमाद्वारे शाळा ही केवळ शिक्षक विद्यार्थ्यांचीच नव्हे तर संपूर्ण गावाची आहे, ही जाणीव पालकांनी कृतीतून दाखवून दिली. शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, मुख्याध्यापक व शिक्षक यांनी श्रमदान करणाऱ्या सर्व पालकांचे मनापासून कौतुक केले.

यावेळी मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर यांनी सांगितले की, "आजकाल सर्व गोष्टींसाठी मजूर किंवा कंत्राटदारांची मदत घेतली जाते. अशा वेळी पालकांनी स्वतःहून पुढाकार घेऊन शाळेसाठी एक दिवस श्रमदान केले, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांसमोर जिवंत आदर्श घडवणारा हा उपक्रम आहे."शाळेच्या छोट्या–मोठ्या विद्यार्थ्यांनीही पालकांकडून प्रेरणा घेत परिसर स्वच्छतेत हातभार लावला. दिवसभर चाललेल्या कामानंतर संध्याकाळी शाळा परिसराला नवचैतन्य प्राप्त झाले.मायनी कोयना येथील या श्रमदान उपक्रमामुळे ग्रामस्थांच्या एकजुटीचा व शाळेबद्दलच्या आपलेपणाचा सुंदर प्रत्यय आला. "स्वच्छ भारत अभियान" व "हरित गाव निरोगी गाव" या संकल्पनांना हातभार लावणारा हा उपक्रम ठरत असून अशा श्रमदानातून ग्रामीण भागातील इतर शाळांना देखील प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




ठाणे ■ रविवार
२३ नोव्हेंबर २०२५
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# शहापूरमध्ये आदिवासींना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापुर** : शहापुरातील आदिवासींना दादरच्या धरतीमाता क्रीडा मंडळाने मदतीचा हात दिला आहे. या मंडळाने बाभळे येथील 21 आदिवासी कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. धरतीमाता क्रीडा मंडळ हे दरवर्षी अनेक सामाजिक उपक्रम राबवते. या मंडळाने यंदा 51 व्या वर्षात पदार्पण केले आहे. 'एक हात मदतीचा' या अभियनांतर्गत धरतीमाता क्रीडा मंडळाने बाभळे आणि नायकाचापाडा येथील कातकरी वस्तीतील 21 कुटुंबांतील 70 आदिवासींना किराणा सामान, महिला मुली व बालकांना कपडे, बॅग, चादर, चटई, टॉवेल आणि एका कुटुंबाला ताडपत्री या वस्तूंचे वाटप करण्यात आले. हा उपक्रमात यशस्वी करण्यासाठी सोहम शक्तिधाम अनसईमाता देवस्थानने विशेष परिश्रम घेतले.

**आश्रमाला भेट**

सोहम शक्तिधाम अनसईमाता देवस्थान बाभळे येथील आश्रमात येणाऱ्या भाविकांना बसण्यासाठी मोठ्या चटई देण्यात आल्या. यावेळी बाभळे ग्रामपंचायत सरपंच विशाल मुकणे, सदस्य रमेश दिनकर, समन्वयक एस. व्ही. दवणे व ग्रामस्थ उपस्थित होते. मंडळाचे पदाधिकारी जितेंद्र आंबे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सोहम शक्तिधाम अनसईमाता देवस्थानच्या वतीने भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

## आज एकदिवसीय ठाणे जिल्हा साहित्य संमेलन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : राज्य सरकार, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई व सार्वजनिक वाचनालय, कल्याण यांच्या अनुदानातून एकदिवसीय ठाणे जिल्हा साहित्य संमेलन महावीर हॉल येथे रविवारी (दि. २३) सकाळी ९ ते ६ या वेळेत होणार आहे.संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक अशोक नायगावकर यांच्या हस्ते होणार असून, संमेलनाध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिक संजय जोशी भूषविणार आहेत. संमेलनाचा प्रारंभ ग्रंथदिंडीने होणार असून, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त एकनाथ आव्हाड यांची थेट भेट मुलाखतकार विद्या प्रभू घेणार आहेत. नवपिढीचे साहित्यिक व परिसंवाद या कार्यक्रमात कवी प्रथमेश पाठक, प्रकाशक संजय शिंदे, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त विशाखा गढरी सहभाग घेणार आहेत. माझी माउली मराठी चर्चात्मक कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक अशोक बागवे, गझल संध्या कार्यक्रमात ज्येष्ठ गझलकार आप्पा ठाकूर, ज्येष्ठ गझलकार ममताताई सिंधूताई सपकाळ सहभागी होणार आहेत.ठाणे जिल्ह्यातील मान्यवर साहित्यिकांचा सन्मान सोहळा, ग्रंथ प्रदर्शन व विक्री होणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष व वाचनालयाचे अध्यक्ष मिलिंद कुलकर्णी यांनी दिली. कल्याणकरांनी या साहित्यिक मेजवानीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सरचिटणीस भिकू बारस्कर यांनी केले आहे.


# वारंवार कचरा पडणाऱ्या शहरातील ठिकाणांचे स्वच्छतेसह सुशोभीकरण सुरू

### कल्याण-डोंबिवलीत स्वच्छतेचा नवा अध्याय

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली परिसरातील अस्वच्छता निर्मुलनाबाबत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. याच प्रयत्नांमध्ये आता आणखी एका नव्या अध्यायाची भर पडली असून, महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून शहरात वारंवार कचरा पडणारी ठिकाणे स्वच्छ करून सुशोभित करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. त्यासाठी महापालिका परिक्षेत्रातील नागरिकांनी सार्वजनिक वा खाजगी जागी, रस्त्यावर कचरा न फेकता केवळ महापालिकेच्या घंटागाडीमध्येच देण्याचे आवाहन घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त रामदास कोकरे यांनी केले आहे.

शहरातील काही ठिकाणांवर पडणाऱ्या उघड्या कचऱ्यामुळे, त्याभागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्यासह शहराचा चेहरा मोहराही आणखीनच विद्रूप होऊ लागला होता. त्यावर आता घनकचरा व्यवस्थापन विभागाने अनोखी



शक्कल लढवत अशा वारंवार कचरा पडणाऱ्या ठिकाणांना कायमस्वरूपी स्वच्छ राखण्याच्या दिशेने एक मोहीम हाती घेतली आहे. त्याअंतर्गत कल्याण पश्चिमेतील बारावे जलशुध्दीकरण केंद्र परिसर, बारावे गाव या दोन आणि ठाकुर्ली पूर्वेच्या स्टेशन रोड परिसरात एका ठिकाणाचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. कल्याणातील 3 प्रभागात महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांमार्फत तर उर्वरित 7 प्रभागांमध्ये सुमित एल्कोप्लास्ट कंपनीच्या सफाई कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून ही मोहीम राबविण्यात येत आहे.

वारंवार कचरा पडणाऱ्या ठिकाणाच्या मागची कारणे शोधण्यासाठी महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने शोधमोहीम सुरू केली असून, मोकळ्या जागेवर रात्रीच्या वेळेत कचरा पडत असल्याचे निदर्शनास आल्याची



माहिती उपआयुक्त रामदास कोकरे यांनी दिली.

कल्याण डोंबिवलीतील अशा भागांमध्ये आता रात्रीच्या सत्रात महापालिकेकडून घंटागाडी पाठवण्यात येत आहे. जेणेकरून रस्त्यावर पडणारा कचरा बंद होईल. अशा प्रकारे महापालिका कर्मचाऱ्यांकडून कचरामुक्त आणि स्वच्छ केलेले काचर्याची ठिकाणे आकर्षक दिसणार आहेत. या ठिकाणांवर आकर्षक रंगांनी रांगोळ्या, भित्तीचित्रे काढणे, जुन्या टायरमध्ये सजवलेल्या रंगीत कुंड्या ठेवणे, शोभेची झाडे आणि छोटेखानी हिरवळ निर्माण करणे इ. सुशोभीकरण केले जाणार आहे, जेणेकरून याठिकाणी

### रस्त्यावर कचरा टाकण्याऐवजी घंटागाडीमध्ये देण्याचे केडीएमसीचे आवाहन

कचरा टाकण्यापासून नागरिकांना परावृत्त करता येईल.

येत्या काळात कल्याण डोंबिवलीत असणारी सर्वच कचऱ्याची ठिकाणे अशा प्रकारे बंद करून त्यांचे सुशोभीकरण करून संपूर्णपणे कचरामुक्त केली जाणार आहेत. त्यासाठी नागरिकांनी घरातील कचरा वर्गीकरण करून केवळ घंटागाडीमध्येच देण्यासह अशाप्रकारची गलिच्छ ठिकाणे आपल्या परिसरात निर्माण न होण्याची दक्षता घेण्याचे आवाहनही कल्याण डोंबिवली महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त रामदास कोकरे यांनी केले आहे.


दरम्यान यापूर्वी मे 2020 मध्ये कल्याण डोंबिवली शहरात तब्बल 3 हजार 700 च्या आसपास कचराकुंड्या अस्तित्वात होत्या. त्या काढण्यात आल्यानंतर घंटागाडीमध्येच कचरा देण्याची पद्धत सुरू करण्यात आली होती. या बदलामुळे परिसरात केवळ स्वच्छताच झाली नाही तर एक नवा हरित कोपरा उभा राहणार असल्यामुळे, शहराच्या सौंदर्यीकरणातही भर पडण्यास मदत होणार आहे.

## दहा वर्षीय आन्वीचा समुद्र विक्रम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : धैर्य आणि सहनशक्तीचे एक चित्तथरारक प्रदर्शन करत, १० वर्षीय आन्वी शैलेश सुवर्णाने अटल सेतू ते गेटवे ऑफ इंडिया पर्यंत १७ किलोमीटरचे खुल्या पाण्यात समुद्रात पोहणे यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. हा एक असा पराक्रम आहे जो तिला भारतातील सर्वात तरुण जलतरणपटूंमध्ये स्थान देतो. ज्यांनी इतका आव्हानात्मक लांब पल्ल्याच्या समुद्री मार्गावर पोहणे पूर्ण केले आहे. ही कामगिरी आणखी विलक्षण बनवते ती म्हणजे तिने तिच्या १० व्या वाढदिवशी ती पूर्ण केली.

आन्वीने पहाटे २:२६ वाजता अटल सेतू येथून तिचा उल्लेखनीय प्रवास सुरू केला आणि गेटवे ऑफ इंडिया येथे अंतिम टप्पा गाठला. सकाळी ५:११ वाजता, २ तास ४४ मिनिटांत हे कठीण खुल्या समुद्रातील मार्ग प्रभावीपणे पूर्ण केले. डोंबिवलीची रहिवासी असलेली आन्वी हि यश जिमखाना येथे प्रशिक्षक विलास माने आणि प्रशिक्षक रवी नवले यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली अनेक महिन्यांपासून कठोर प्रशिक्षण घेत आहे. त्यांच्या शिस्तबद्ध प्रशिक्षणामुळे आणि तिच्या अढळ दृढनिश्चयामुळे तिला खुल्या समुद्रातील अप्रत्याशित आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार असलेली एक आत्मविश्वासू, दृढ




तरुण जलतरणपटू बनवले.

पहाटेच्या वेळी जेव्हा ती तिच्या पालकांनी, प्रशिक्षकांनी आणि समर्थकांनी वेढलेली अंतिम फेरी गाठली तेव्हा वातावरण अभिमानाने आणि भावनेने भरून गेले. तिच्या या कामगिरीमुळे महाराष्ट्र आणि त्यापलीकडे अनुभवी जलतरणपटू, स्थानिक रहिवासी आणि क्रीडाप्रेमींकडून कौतुकाचा वर्षाव झाला आहे, अनेकांनी तिला देशभरातील तरुण खेळाडूंसाठी प्रेरणास्थान म्हटले आहे. आन्वीची ही कामगिरी समर्पण, शिस्त आणि प्रचंड आत्मविश्वास काय साध्य करू शकते याचे एक ज्वलंत उदाहरण आहे. फक्त १० वर्षांची, जेव्हा आवड मार्ग दाखवते तेव्हा वय अडथळा ठरत नाही हे तिने सिद्ध केले आहे.

## भाजपाच्या ठाणे शहर जिल्हा सांस्कृतिक प्रकोष्ठ अध्यक्षपदी राजेश जाधव यांची नियुक्ती



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : भारतीय जनता पार्टीच्या ठाणे शहर जिल्ह्यातील विविध सेल प्रकोष्ठ आणि विभाग अध्यक्षांच्या नियुक्त्या नुकत्याच जाहीर झाल्या असून ठाणे शहर जिल्हा सांस्कृतिक सेलच्या अध्यक्षपदी राजेश जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. जाधव हे गेली 25 वर्षे ठाण्यात सामाजिक सांस्कृतिक काम नेटाने करत आहे. भाजपा पक्षात त्यांनी उपाध्यक्ष, एक भारत श्रेष्ठ भारत संयोजक अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी पार पडल्या आहेत. या काळात त्यांनी आंदोलने आणि निवडणुकीच्या कामात सक्रिय सहभाग घेतला आहे. एक भारत श्रेष्ठ भारत च्या माध्यमातून सर्व राज्यांचे स्थापना दिवस साजरे केले आहेत. ते काम लोकांपर्यंत व्यवस्थित पोचले तसे ब्रह्मांड कट्ट्याचे अठरा वर्षाचे कार्य याचीच पोचपावती म्हणून संस्कृतिक प्रकोष्ठ अध्यक्ष पद भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली असून ठाणे शहर अध्यक्ष संदीप लेले यांनी सोमवारी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. येणाऱ्या महापालिकेच्या निवडणुकीत तसेच सांस्कृतिक सेल च्या माध्यमातून हिरीरीने काम करणार असून पक्षाच्या विजयात संस्कृतिक विभागाचे मोठे योगदान राहिल, असा विश्वास श्री. राजेश जाधव यांनी व्यक्त केला.

# भाजपच्या नेत्या चित्रा वाघ यांनी घेतली अर्णव खैरे कुटुंबाची भेट

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : लोकल ट्रेनमध्ये मराठी हिंदी वादातून कल्याण पूर्वेतील अर्णव खैरे या विद्यार्थ्याने आत्महत्या केली असून, या घटनेनंतर सर्वच स्तरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. याप्रकरणी भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांनी आज कल्याण पूर्वेत येऊन खैरे कुटुंबियांची भेट घेत सांत्वन केले. अर्णव हा भाषा वादाचा बळी ठरला असून तुमच्या मुलांचे राजकीय भविष्य घडवण्यासाठी मराठी मुलाचा बळी घेणार का ? असा सवाल चित्रा वाघ यांनी ठाकरे बंधूंना केला आहे.



यावेळी चित्रा वाघ यांनी बोलतांना सांगितले कि, फक्त हिंदीचे एक वाक्य बोलला म्हणून त्याला मारहाण केली त्या धक्क्यातून त्याने आत्महत्या केली. भाषा संवादाचे साधन की विवादाचे साधन हा प्रश्न आहे. अर्णव हा हुशार मुलगा होता त्याचा बळी घेतला, काय मिळवलं हे करून, त्या मुलाची काय अवस्था केली, त्याची काय चूक होती, याची कोण जबाबदारी घेणार असा सवाल करत काही नेत्यांनी त्यांच्या अस्तित्वासाठी त्यांचं राजकीय भवितव्य घडवण्यासाठी जे विष पेरलं त्याचा पहिला बळी अर्णव खैरे ठरला आहे. भाषा भाषांमध्ये लढवायच जे काम आहे त्यातून एका मुलाचा बळी गेला. कथित नेत्यांचे मुलं पाट्यांमध्ये जातात तेव्हा मराठी बोलतात का. मराठी भाषेचा अभिमान मात्र दुसऱ्या भाषेचा द्वेष का करता. तो मराठी मुलगा होता. मारणारे मराठी होते यातून काय साध्य केलं. ज्या परिवाराने मुलाला गमावले त्याची आई वडीलांची अवस्था बघा. एखाद्याचा जीव घेऊन मराठी अस्मिता वाढवणार का. भाषेवरचं असुरी प्रेम थांबवा, आता तरी सुधरा असा सल्ला दिला.

ज्यांनी अर्णवला मारलं त्याचा बळी घेतला त्यांना पोलीस शोधतील. तुमच्या मुलांच्या राजकीय भविष्य घडवण्यासाठी मराठी मुलाचा बळी घेणार का ? असा सवाल करत भाषेचं विष पेरायचं काम करतायत, भाषेवरच असुरी प्रेम थांबवलं पाहिजे. येणाऱ्या दिवसात राज्याचे मुख्यमंत्री निश्चित यांवर कारवाई करतील असे चित्र वाघ यांनी सांगितले.

# भिवंडी महाविद्यालयात जागतिक दूरदर्शन दिन साजरा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : दूरदर्शन हे समाजाला दिशा देणारे एक प्रभावी माध्यम आहे.जगातील घडामोडी, ग्रामीण व शहर,ठिकाण स्थितीविषयी माहिती घरबसल्या दूरदर्शनच्या माध्यमातून व्यक्तींना मिळत असते.चित्रपट गृह व टीव्ही दूरदर्शन हे मनोरंजनाचे मुख्य घटक मानले जातात. बदलत्या काळातही टीव्हीची पकड मजबूत असून ते आपल्या जीवनातील एक महत्त्वाचं साधन आहे असे मत भिवंडीतील पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष बाळकृष्ण काळे यांनी आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले आहे.

भिवंडीतील बीएनएन महाविद्यालय मास मीडिया पदवी विभागातर्फे जागतिक टेलिव्हिजन दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी काळे बोलत होते प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अभिनेते विनायक सिंग, पत्रकार संजय भोईर,प्रभारी प्राचार्य डॉ.शशिकांत म्हाळुंकर,उपप्राचार्य देवीदास



अहिरे,डॉ.सुधीर निकम,डॉ.निनाद जाधव अदि मान्यवर प्राध्यापक उपस्थित होते.

टेलिव्हिजन मुळे जग जवळ आले आहे.त्यामुळे ज्ञान आदानप्रदान होऊ शकत असल्याने समाज प्रगल्भ होण्यास मदत झाली आहे मत श्री. काळे यांनी व्यक्त केले.

आजचे विद्यार्थी रंगीत युगातील आहेत,पण पन्नाशी पार केलेल्या सर्वांनी टेलिव्हिजनचा ब्लॅक अँड व्हाईट काळ अनुभवला आहे.आता बहुतांश घरात रंगीत टेलिव्हिजन आला आहे. टिव्ही हे फक्त मनोरंजनाचे साधना बरोबर ज्ञान, विज्ञान,जनजागृती करणारे महत्त्वाचे साधन आहे असे मत पत्रकार संजय भोईर यांनी केले. तर अभिनेते विनायक सिंग यांनी अभिनयाचे त्रिसूत्री सांगून विद्यार्थ्यांसोबत अभिनयाचे प्रात्यक्षिकेचे सादरीकरण केले. यावेळी इतर ही मान्यवरांनी आपली मौलिक मत व्यक्त करून कार्यक्रम सांगता केली.यावेळी प्रा.प्रमोद शेवाळे,प्रा.जरमीन मोमीन,प्रा.अंकुश चव्हाण, प्रा.गणेश पानझाडे,प्रा. प्रियंका जाधव, प्रा.नीलम सेन प्रा. अक्षय भोईर,यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम सूत्रसंचालन विद्यार्थिनी दिव्या मेहता,सबा मोमीन यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. शिवम भानुशाली यांनी केले.

## हिंदू जनजागृती समितीतर्फे मुंगोशी येथे मंदिर स्वच्छता उपक्रम



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : हिंदु जनजागृती समितीने मुंगोशी येथील श्री जय हनुमान व्याघ्रेश्वर मंदिर परिसरात स्वच्छता उपक्रम राबविला. मंदिरातील दर्शनमार्ग, सभोवतालचा परिसर, तसेच मंदिर कळसाच्या येथील छताची स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमात रायगड जिल्ह्यातील अनेक तरुण मुलामुलींनी मनापासून सहभाग घेतला. हिंदु जनजागृती समिती गेल्या काही वर्षांपासून मंदिर स्वच्छता, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी सातत्यपूर्ण मोहीमा राबवत असून, तरुण पिढीमध्ये स्वच्छता व इतिहास-संवर्धनाची जाण निर्माण करण्याचे काम करत आहे. या उपक्रमाबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून, अशा उपक्रमांमुळे गावातील धार्मिक स्थळे स्वच्छ, सुरक्षित आणि आकर्षक राहतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# ताडोबा व्याघ्र प्रकल्प परिसरातील जागेचे होणार पर्यावरणीय पुनरुज्जीवन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : विदर्भातील विविध विकास कामांबरोबरच तेथील जंगल संपदा राखण्यासाठी व त्याच्या वाढीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नेहमीच आग्रही आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प परिसरातील 800 एकर जागेचा पर्यावरणीय पुनरुज्जीवन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाला झिरोधा कंपनी व रेन मॅटर फाऊंडेशन सामाजिक उत्तरदायित्वातून सहकार्य करणार आहेत.

रिवाईल्डिंग म्हणजे जंगल, गवताळ प्रदेश किंवा जलक्षेत्रात मानवी हस्तक्षेप कमीत कमी ठेवून तेथील नैसर्गिक भूभाग, वन्यजीव आणि जैवविविधतेचे पर्यावरणीय पुनरुज्जीवन करणे होय. या संकल्पनेनुसार ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील 800 एकर क्षेत्राचे पर्यावरणीय पुनरुज्जीवन करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. महाराष्ट्रातील हा पहिलाच प्रकल्प ताडोबामध्ये राबविण्यात येणार असून यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाबरोबरच फार्मर्स फॉर फॉरेस्ट यांच्या सहकार्याने झिरोधा व रेनमॅटर फाऊंडेशन ही संस्था काम करणार आहे. यासाठी सुमारे 100 कोटी रुपयांच्या झिरोधा रिवाइल्डिंग फंड हा विशेष निधी तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पासंदर्भातील औपचारिक घोषणा लवकरच होणार आहे.

झिरोधा आणि 'रेनमॅटर फाउंडेशन' या संस्थांच्या माध्यमातून पर्यावरणीय व सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. रेनमॅटर फाउंडेशनमार्फत हवामान बदल व पर्यावरणीय ऱ्हास या समस्यांवर कामे करण्यात येतात. यासाठी झिरोधा ही कंपनी आपल्या नफ्यातील 10 टक्के निधी सामाजिक उत्तरदायित्व व पर्यावरणीय कामांसाठी राखीव ठेवते. या राखीव निधीतून झिरोझाने संस्थेच्या 15 व्या वर्धापन दिनानिमित्त 100 कोटी रुपये गुंतवणुकीचा 'झिरोधा रीवाइल्डिंग फंड' जाहीर केला आहे. या उपक्रमांतर्गत देशातील पर्यावरणीय दृष्टिकोनातून महत्त्वाच्या परिसरातील निसर्गाचे पुनरुज्जीवन करण्यात येणार आहे. त्यामध्ये देशात विविध ठिकाणी मोनोकल्चर

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला 'झिरोधा'चा प्रतिसाद

वृक्षलागवडी ऐवजी जैवविविधता टिकवणाऱ्या पद्धतीने निसर्गाचा समतोल राखण्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये विदर्भातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील 800 एकरच्या प्रकल्पाचा समावेश आहे. विदर्भातील पर्यावरणाच्या संवर्धनासाठी रिवाइल्डिंग सारखे प्रकल्प उपयुक्त आहे. अशा कामांमध्ये झिरोधा सारख्या कार्पोरेट कंपन्या सहभागी होत असून हा पर्यावरणपूरक उपक्रम केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर देशातील कॉर्पोरेट क्षेत्रासाठीही एक आदर्श ठरणार आहे. या उपक्रमाबद्दल अत्यंत उत्साही आहोत. महाराष्ट्र शासन आणि वन विभागासोबतचे हे सहकार्य फलदायी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024